**नियमित फौजदारी खटला क्र.१४/२०१३**
**शासन वि. वाशीम शेख व इतर**
**नि.क्र.७७**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०२,**

**नाव – बेबी फातिमा महमंद इसा,**

**वय – ३० वर्षे,**

**व्यवसाय – घरकाम ,**

**पत्ता – रा. उदगीर ता. उदगीर**

**साक्षीदार क्र. ०२ यांचा शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री.ए.एस.कदम यांच्याद्वारे सुरुः–**

वसीम हा नात्याने माझा शोहर होय. २०१२ साली माझ्यासोबत त्याचे लग्न झाले होते. लग्नानंतर मी माझ्या सासरी राहायला गेले. मी त्या ठिकाणी सर्व आरोपीसोबत राहत होते. त्यांनी मला निट वागवले नाही. ते माझ्याशी भांडण करायचे व मला मारायचे. अ‍ॅटोला एक लाख रुपये मिळावे म्हणून मला मारायचे. जेष्ठ, जेष्ठानी,नंदा,सासू व शोहर हे माझ्याकडे पैश्याची मागणी करायचे. आरोपी पैसे न दिल्याने मला मारुन टाकायची धमकी द्यायचे. माझे आई वडील ऐवून आरोपीची समजूत काढायचे. माझ्या आई–वडीलांनी त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला असता आरोपी यांनी पैश्याची मागणीसाठी मला घरातून हकलून दिले. त्यामुळे मी आई–वडीला सोबत माहेरी आले. आम्ही महिला मंडळ मध्ये गेलो तसेच इतर नातेवाईक कडून वाद मिटविण्याचा प्रयत्न करत होतो. परंतू आरोपी क्र.१ यांने मला तलाखची नोटीस दिली. मी मग पोलिसात दिली. मला दि.२९.१२.२०१२ रोजीची फिर्यादी दाखविली ती तीच आहे. ती मला वाचून दाखविली. ती फिर्याद मला हिंदी मध्ये अनुवादीत करुन वाचून

दाखविली. ती तीच असून तिला **निशाण ७८** देण्यात आला. मला माझी संगणकावरील फिर्याद मला दाखविली ती तीच असून त्यावर माझी सही आहे. तिला **निशाण ७९** देण्यात आला. कार्टासमोर असणारे आरोपी तेच आहेत.

**साक्षीदार क्र.२ चा उलटतपास आरोपी क्र. १ ते ५ तर्फे श्री.ए.के.सय्य्द, विधीज्ञ यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

मी आरोपी मला घरातून काढून दिल्यानंतर मी पोलिसात तक्रार दिली होती. मी त्यापुर्वी मारहाण केली होती म्हणून पोलिसात तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ही केस दाखल करण्यापुर्वी कोणतीही केस पोलिसात दाखल केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, लग्नापुर्वी आरोपी क्र. १ घरी येवून मला पाहून पंसद करुन गेला होता. आरोपी हा दुरुन आमच्या नातेसंबधातील नातेवाईक आहे. मी काळी हे म्हणून मला मारहान केली आणि जिवे मारणयाची धमकी दिली आणि मारहाण केली त्यांची नक्की तारीख सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला काळे म्हणाले नाहीत, धमकी दिली नाही आणि मारहाण केली नाही म्हणून मला तारीख आठवत नाही. आरोपी यांनी अॅटो घेण्यासाठी एक लाख रुपये मागीतले त्याबाबत मी आरोपी क्र. १ चे अॅटो चालविण्याचे लायसन्स् या केसच्या कामी दाखल केलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपी क्र.१ हा अॅटो चालवत नाही त्यांचा भाउ अॅटो चालवितो. हे म्हणणे बरोबर आहे की, मी आरोपीच्या घरी तीन महिने राहिले. हे म्हणणे खरे नाही

की, आरोपी यांनी मला कोणती मारहाण केली नाही, शिवीगाळ केली नाही, धमकी दिली नाही किंवा मागणी केली नाही. मी स्वतः माहेरी निघून आले. हे म्हणणे बरोबर आहे की, मी आता दुसरे लग्न केले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुंबईच्या नव–यावर त्यांच्या पहिल्या पत्नीने केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीची पहिली पत्नी त्यांच्याकडे पैसे मागत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी मला धमकी दिली, मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दोन्ही नंदा माझ्या सासर वाडीच्या घरी राहत नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी नंदाच्या विरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी एक लाख रुपायाच्या मागणीसाठी मला घरातून काढून दिली हे मी खोटे सांगत आहे.  आरोपी यांनी मला एक लाख रुपये मागितली, त्यासाठी मला घरातून काढून दिले हे दाखविण्यासाठी माझ्या तोंडी शब्दा शिवाय अन्य पूरावा नाही. माझ्या शारीरीक तपासणी विषयी कोणताही वैदयकीय अहवाल या केसच्या कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

फेर तपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.06.11 16:56:38 +0530

**ठिकाणःउदगीर** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**दिनांक – ११/०६/२०२६** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**